Schedule for Institute Level Round for admission to B.Sc.Nursing course in Government/ Private Unaided/Minority Colleges.

| Sr.No. | Activity | Dates |
|---|---|---|
| 1 | Publication of Seat Matrix for Institutional Level Round and Provisional List of Eligible candidates for Institutional Level round. | 27/10/2026 |
| 2 | The eligible desirous candidate must apply in person/any person to respective college in prescribe format. | 28/10/2026 to 29/10/2026 upto 05.30 pm |
| 3 | Publication of General Merit List and Quota Wise Merit list, Selection List-1 and Wait List separately at notice board and the web site of respective Colleges. | 29/10/2026 by 06.30 pm |
| 4 | Physical Joining and Filling Status Retention of candidates from Selection List-1 dated 29/10/2026 by submitting all original Documents & payment of Requisite Fees by DD/ Cheque. | 30/10/2026 upto 05.30 pm |
| 5 | Publication of Residual vacancy at notice board and the web site of respective Colleges. | 30/10/2026 by 06.30 pm |
| 6 | Reporting of eligible candidates with Original Documents and Requisite Fees to college for Residual Vacancy. Candidates should enquire with the college regarding mode of payment of fees in advance to avoid last minute trouble. | 31/10/2026 |
| 7 | Filling of Residual Vacancy from reported eligible candidates from list published on the website on the basis of merit. | 31/10/2026 03.30 pm onwards |
| 8 | Reporting of admitted candidates in College Feedback Module | 31/10/2026 |
| 9 | Cut-off date of admission for B.Sc.Nursing Course for Academic Year 2026-27 as per Indian Nursing Council | 31/10/2026 |

The above schedule is subject to change as per the Instructions of Hon'ble Court/ INC/ Central Govt/ State Govt as the case may be.

Instructions for Institute Level Round :

1. Candidates who have seat in hand, as on 27/10/2026, 05.30 pm will not be eligible for Institute Level round. Their names will not be included in list of eligible candidates for Institute Level Round
2. Eligible candidate can apply to any of the college as per the Seat Matrix. They should ensure to attach photocopies of all essential documents with the application form.
3. The application form shall be submitted to the college only. No form will be accepted at CET CELL office either personally or by email.
4. Candidates should ascertain the fees of the college before applying.
5. It is responsibility of the candidate to submit original documents and necessary fees to the college during Institute level round.

Sd/-
Commissioner,
Maharashtra State Common Entrance
(Test) Cell, Mumbai

Scanned with OKEN Scanner

शासकीय/खाजगी विनाअनुदानित/अल्पसंख्याक महाविद्यालयांमधील बी.एस्सी. नर्सिंग प्रवेशासाठी
संस्थास्तरीय फेरीचे वेळापत्रक

| अ.क्र. | तपशिल | दिनांक व वेळ |
|---|---|---|
| १ | संस्थास्तरीय फेरीसाठी रिक्त जागांचा तपशील व पात्र उमेदवारांची तात्पुरती यादी प्रसिद्ध करणे | २७/१०/२०२६ |
| २ | प्रवेशासाठी इच्छुक व पात्र उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्ज संबंधित महाविद्यालयात स्वतः किंवा प्रतिनिधीमार्फत प्रत्यक्ष सादर करणे | २८/१०/२०२६ ते २९/१०/२०२६ सांय. ०५.३० पर्यंत |
| ३ | सर्वसाधारण गुणवत्ता यादी, प्रवर्गनिहाय गुणवत्ता यादी, प्रथम निवड यादी (Selection List-१) व प्रतीक्षा यादी (Wait List) स्वतंत्रपणे संबंधित महाविद्यालयाच्या सूचना फलकावर व संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे | २९/१०/२०२६ सायं. ०६.३० नंतर |
| ४ | दिनांक २९/१०/२०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या प्रथम निवड यादीतील उमेदवारांनी सर्व मूळ कागदपत्रे सादर करून व आवश्यक शुल्क डिमांड ड्राफ्ट (DD)/धनादेशाद्वारे भरून महाविद्यालयात प्रत्यक्ष प्रवेश घेणे. | ३०/१०/२०२६ |
| ५ | रिक्त जागांचा तपशील (Residual Vacancy) संबंधित महाविद्यालयाच्या सूचना फलकावर व संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे | ३०/१०/२०२६ सांय. ०६.३० नंतर |
| ६ | शिल्लक रिक्त जागांसाठी पात्र उमेदवारांनी सर्व मूळ कागदपत्रे व आवश्यक शुल्कासह संबंधित महाविद्यालयात उपस्थित राहणे. शेवटच्या क्षणी अडचण निर्माण होऊ नये म्हणून उमेदवारांनी शुल्क भरण्याच्या पद्धतीबाबत संबंधित महाविद्यालयाकडे पुर्व चौकशी करावी. | ३१/१०/२०२६ |
| ७ | संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेल्या यादीतील उपस्थित पात्र उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार शिल्लक रिक्त जागा भरणे. | ३१/१०/२०२६ दुपारी ०३.३० नंतर |
| ८ | प्रवेशित उमेदवारांची माहिती महाविद्यालयाच्या फीडबॅक मॉड्यूलमध्ये (College Feedback Module) नोंदविणे | ३१/१०/२०२६ |
| ९ | भारतीय परिचर्या परिषदेच्या निर्देशानुसार शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील बी.एस्सी. नर्सिंग अभ्यासक्रमांसाठी प्रवेशाची अंतिम मुदत. | ३१/१०/२०२६ |

संस्थास्तरीय प्रवेश फेरीसाठी सूचना :

१. दिनांक २७/१०/२०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत ज्या उमेदवारांकडे प्रवेशासाठी जागा निश्चित (Seat in Hand) असेल, असे उमेदवार संस्थास्तरीय प्रवेश फेरीसाठी पात्र राहणार नाहीत. अशा उमेदवारांची नावे संस्थास्तरीय प्रवेश फेरीसाठी पात्र उमेदवारांच्या यादीमध्ये समाविष्ट केली जाणार नाहीत.
२. पात्र उमेदवारांना जागांच्या उपलब्धतेच्या तक्त्यानुसार (Seat Matrix) कोणत्याही महाविद्यालयात प्रवेशासाठी अर्ज करता येईल. अर्जासोबत सर्व आवश्यक कागदपत्रांच्या छायांकित प्रती जोडल्याची उमेदवारांनी खात्री करावी.
३. प्रवेशासाठीचा अर्ज केवळ संबंधित महाविद्यालयातच सादर करावा. कोणताही अर्ज वैयक्तिकरीत्या किंवा ई-मेलद्वारे राज्य सीईटी कक्षात स्वीकारला जाणार नाही.
४. उमेदवारांनी प्रवेशासाठी अर्ज करण्यापूर्वी संबंधित महाविद्यालयाचे शुल्क (Fee Structure) तपासून घ्यावे.
५. संस्थास्तरीय प्रवेश फेरीदरम्यान संबंधित महाविद्यालयात मूळ कागदपत्रे व आवश्यक शुल्क विहित मुदतीत सादर करण्याची संपूर्ण जबाबदारी उमेदवाराची राहील.

स्वाक्षरी /-
आयुक्त
महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा
(सीईटी) कक्ष, मुंबई

Scanned with OKEN Scanner